# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **ता. १६ ऑक्टोबर २०१९**

# महापौर व उपमहापौर निवडणूक प्रक्रिया सोमवारपासून

## उमेदवार भरणार १८ नोव्हेंबरला नामनिर्देशन : २२ नोव्हेंबरला निवडणूक

**नागपूर, ता. १६ :** नागपूर महानगरपालिकेच्या नव्या महापौर व उपमहापौर निवडीची प्रक्रिया येत्या सोमवार (ता.१८) पासून सुरू होत आहे. सोमवारी इच्छुक उमेदवार नामनिर्देशनपत्र सादर करतील तर २२ नोव्हेंबरला महापौर पदासाठी निवडणूक घेण्यात येईल.

महापौर नंदा जिचकार व उपमहापौर दीपराज पार्डीकर यांचा अडीच वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर आता नागपूर महानगरपालिकेला नवीन महापौर व उपमहापौर मिळणार आहेत. महापौर पदासाठी खुल्या प्रवर्गातील तर उपमहापौर पदासाठी अनारक्षित सोडत निघाली आहे. महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीच्या प्रक्रियेला सोमवार १८ नोव्हेंबरपासून सुरूवात होत आहे. सोमवारी इच्छुक उमेदवार नामनिर्देशनपत्र सादर करतील. मनपा मुख्यालयातील डॉ.पंजाबराव

देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहामध्ये नामनिर्देशनपत्र स्वीकारले जाईल.

शुक्रवारी २२ नोव्हेंबरला महाल येथील राजे रघुजी भोसले नगर भवन येथे निवडणूक प्रक्रिया पार पाडली जाईल. शुक्रवारी सुरूवातील पिठासीन अधिका-यांद्वारे नामनिर्देशपत्राची छाननी केली जाईल. यानंतर उमेदवारांना नामनिर्देशनपत्र मागे घेण्यास वेळ दिला जाईल. पिठासीन अधिका-यांद्वारे उमेदवारांची नावे घोषित झाल्यानंतर आवश्यक असल्यास मतदान घेण्यात येईल. यानंतर पिठासीन अधिकारी नवनिर्वाचित महापौर व उपमहापौर यांच्या नावाची घोषणा करतील.